**ठळक बातम्या**

- सरकारी जमिनींवरच्या अतिक्रमणाला जबाबदार असलेल्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याचा राज्य सरकारचा विचार

- राज्यभरातल्या ३ हजार तीनशेहून अधिक धार्मिक स्थळांवरचे भोंगे हटवल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची माहिती

- शनी शिंगणापूर देवस्थानातही सरकारची समिती नेमण्याचा राज्य सरकारचा विचार, ॲप घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश

**आणि**

- विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत आज जोकोविच, सिनर, अल्काराज, फ्रिट्झ यांचे सामने

**<><><><><>**

राज्यातल्या सरकारी जमिनींवर अतिक्रमण करून अनधिकृत बांधकाम करण्यासाठी जबाबदार असणाऱ्या महसूल विभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी विचार सुरू आहे अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज विधानसभेत दिली.

राज्यातील वन विभागाच्या बाहेर असणाऱ्या बफर झोनमधल्या शेतजमिनी वार्षिक भाड्याने घेऊन त्यावर सौर ऊर्जा प्रकल्प अथवा सुगंधी गवत लावलं जाईल, अशी माहिती वन मंत्री गणेश नाईक यांनी दिली. जंगली प्राण्यांच्या भीतीमुळे याठिकाणी शेती होत नसल्याचा मुद्दा सुलभा खोडके यांनी उपस्थित केला होता. वन विकास महामंडळाकडून वार्षिक पन्नास हजार रुपये भाड्याने घेऊन त्यावर हे प्रकल्प राबविण्यात येतील, महसूल आणि वन विभागाने एकत्रितरित्या हा निर्णय घेतल्याचं वनमंत्री म्हणाले. एमपीएससीनं घेतलेल्या लिपिक आणि टंकलेखक

परीक्षेचा निकाल लवकरच जाहीर होणार आहे. या परीक्षेच्या संदर्भात काही विद्यार्थ्यांनी मॅटमध्ये याचिका दाखल केली होती. मॅटनं तोंडी निकाल दिला आहे. त्यांचा निकाल अधिकृतरित्या जाहीर झाल्यावर यशस्वी विद्यार्थ्यांची यादी जाहीर करू, अशी माहिती मंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेच्या दरम्यान दिली. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रतिभासेतू नावाचा नवा प्रकल्प राबवण्यात येईल, अशी घोषणाही त्यांनी यावेळी केली.

**<><><><><>**

राज्यभरातल्या एकंदर ३ हजार ३६७ धार्मिक स्थळांवरचे भोंगे आत्तापर्यंत हटवण्यात आल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत लक्षवेधी सूचनेवरच्या चर्चेदरम्यान दिली. मुंबईत १ हजार ६०० हून अधिक ठिकाणचे भोंगे हटवले आहेत. ही कारवाई सामंजस्याने, धार्मिक तणाव निर्माण होऊ न देता केल्याबद्दल त्यांनी मुंबई पोलिसांचं कौतुक केलं. हटवलेले भोंगे पुन्हा लावले तर तिथल्या पोलीस ठाण्यातल्या प्रभारी अधिकाऱ्याला जबाबदार धरलं जाईल, असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

शिर्डी आणि पंढरपूरच्या धर्तीवर शनिशिंगणापूर देवस्थानात मंदीर समिती स्थापन करण्याचा राज्य सरकारचा विचार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली. यासाठी कायदा करण्याची सरकारची तयारी आहे. या देवस्थानच्या विश्वस्त मंडळाने कारभारात केलेल्या अनियमिततेबाबत एफआयआर दाखल करायचे आदेश दिल्याचं मुख्यमंत्री म्हणाले. शनिशिंगणापूर देवस्थानाचे बनावट ॲप्स तयार करून पैशांची अफरातफर केल्याप्रकरणी सायबर खात्याच्या पोलीस उपमहानिरीक्षकांच्या देखरेखीखाली चौकशी आणि कारवाई करू, असंही फडणवीस यांनी नमूद केलं. आमदार विठ्ठल लंघे यांनी याविषयी लक्षवेधी उपस्थित केली होती. या घोटाळ्याविषयी ते म्हणाले…

**बाइट - विठ्ठल लंघे**

**<><><><><>**

MHT -CET अर्थात महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षेत २७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत २१ प्रश्नांमध्ये त्रुटी आढळून आल्या आहेत. त्यामुळे यासाठी जबाबदार असलेल्या तीन सदस्यीय समितीची सेवा खंडित करण्यात आली आहे, अशी माहिती उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधान परिषदेत दिली. विभागाकडून आता सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची कार्यकक्षा प्रश्नपत्रिका संच बनवणे, तज्ज्ञांची नियुक्ती आदी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

**<><><><><>**

मुंबई शहर आणि परिसरात जिथे जागा उपलब्ध असेल, अशा ठिकाणी गिरणी कामगारांना घरं बांधून देण्यात येतील असा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या बैठकीत झाल्याची माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी काल विधानसभेत निवेदनाद्वारे दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या गिरणी कामगार संघटना प्रतिनिधींसोबतच्या बैठकीत कामगारांना घरं देण्याबाबत विविध निर्णय घेतल्याचं त्यांनी सांगितलं. शेलू इथली घरं घेण्यासाठी गिरणी कामगारांवर कुठलीही सक्ती करण्यात आलेली नाही, हे सामंत यांनी स्पष्ट केलं. गिरणी कामगारांना झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पात घरं मिळवून देण्यासाठी कोटा तयार करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल, असंही ते म्हणाले.

नागरिकांना आवास योजनेंतर्गत राज्यभरात उपलब्ध असलेल्या सर्व घरांची माहिती सुलभरीत्या एकाच ठिकाणी मिळावी यासाठी ‘महाआवास’ हे विशेष ॲप विकसित केलं जात असल्याची माहिती मंत्री शंभूराज देसाई यांनी काल लक्षवेधी सूचनेच्या

उत्तरात दिली. यामुळे लाभार्थ्यांना स्वतःच्या पसंतीनुसार घर निवडून ऑनलाइन नोंदणी करता येईल, असंही ते म्हणाले.

<><><><><>

इगतपुरीजवळ मुंबई-आग्रा महामार्गावर मुंढेगाव इथं काल कारवर कंटेनर आदळून झालेल्या अपघातात ४ जण ठार झाले. हे सर्वजण अंधेरीत राहणारे होते. गुरुपौर्णिमेच्या निमित्तानं गरुडेश्वर इथल्या बाबा रामदास समाधी मंदिर आश्रमात दर्शन घेउन मुंबईला परतताना हा अपघात झाला.

<><><><><>

अंमली पदार्थ प्रकरणातला आरोपी कुब्बावाला मुस्तफा याला संयुक्त अरब अमिरातहुन भारतात आणण्यामध्ये सीबीआयला यश आलं आहे. सांगलीत सिंथेटिक ड्रग्ज उत्पादन यंत्रणा चालवल्याचा आरोप मुस्तफावर आहे. कुब्बावाला मुस्तफा आणि इतरांशी संबंधित असलेल्या कारखान्यातून २५ लाख रुपयांहून अधिक किमतीचे एकूण १२६ किलो मेफेड्रोन ड्रग्ज जप्त करण्यात आलं आहे.

<><><><><>

नवी मुंबई पोलिसांच्या अंमली पदार्थ विरोधी पथकानं हेरॉईन या अंमली पदार्थाची विक्री करणा-या  नऊ जणांच्या टोळीला अटक केली आहे. पंजाबमधून आलेल्या या आरोपींकडून १२० ग्रॅम वजनाचं ४७ लाख रुपये किंमतीचं हेरॉईन जप्त करण्यात आलं आहे. सीबीडी बेलापूर इथल्या  सी-शोर लॉजमध्ये  सापळा रचून ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

भंडारा जिल्ह्यातल्या  विविध भागात दुकानाचं  शटर तोडून दुचाकी, मोबाईलची चोरी करणाऱ्या चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानं  अटक केली आहे. आरोपींकडून १० मोबाईल, ३ इअरबड्स,  ४ स्मार्ट वॉच, आणि दोन दुचाकी असा  ३ लाखांहून अधिक रकमेचा मुद्देमाल हस्तगत झाला आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या दूरदृश्यप्रणाली द्वारे विविध सरकारी विभागांतल्या नव्यानं नियुक्त झालेल्या युवकांना ५१ हजारांहून अधिक नियुक्ती पत्रांचं वितरण करणार आहेत. हा १६वां रोजगार मेळा देशभरात ४७ ठिकाणी आयोजित केला जाणार असून प्रधानमंत्री यात संबोधन करणार आहेत. नवीन भरती केलेले युवक रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य-कुटुंब कल्याण, कामगार-रोजगार, पोस्ट यासह अन्य विभागांमध्ये सामील होतील. देशभरात रोजगार मेळ्यांद्वारे आजवर १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

<><><><><>

अवजड उद्योग मंत्री एच.डी. कुमारस्वामी यांनी आज पीएम ई-ड्राईव योजनेअंतर्गत इलेक्ट्रिक ट्रक- स्वच्छ आणि शाश्वत इंधन प्रोत्साहन योजना सुरू केली. या योजनेचा उद्देश सुमारे ५ हजार सहाशे ई-ट्रक तैनात करणं, स्वदेशी उत्पादनाला प्रोत्साहन देणं, लॉजिस्टिक्सचा खर्च आणि कार्बन उत्सर्जन कमी करणं हा आहे. यात बॅटरीसाठी ५ वर्षे किंवा ५ लाख किलोमीटरची वॉरंटी समाविष्ट असेल. दिल्लीत नोंदणीकृत सुमारे अकराशे ई-ट्रकांसाठी एक हजार कोटी रुपये तरतूद करण्यात आली आहे.

<><><><><>

कापूस लागवडीतील समस्या, रोपांना होणारे रोग, विणकर आणि कृषी उद्योगाशी संबंधित समस्या सोडवण्यासाठी सरकार उपाययोजना करणार आहे, असं केंद्रीय कृषी आणि शेतकरी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे. कोइम्बतूर येथील आयसीएआर संशोधन केंद्राला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

<><><><><>

विम्बल्डनमध्ये पुरुष एकेरीच्या उपांत्य सामन्यात आज नोव्हाक जोकोविच याच्यासमोर अग्रमानांकित यानिक सिनर याचं आव्हान असेल, तर दुसऱ्या सामन्यात कार्लोस अल्काराज आणि टेलर फ्रिट्झ आज एकमेकांविरुद्ध मैदानात उतरतील.

महिला एकेरीत काल झालेल्या उपांत्य सामन्यात अमांडा अनिसिमोव्हा हिनं अग्रमानांकित अरीना साबालेंका हिला पराभवाचा धक्का दिला. अटीतटीच्या सामन्यात अमांडा हिनं अरीना हिच्यावर ६-४, ४-६, ६-४ अशी मात केली. अजिंक्यपदासाठी आता तिच्यासमोर इगा श्वियांतेक हिचं आव्हान असेल. इगा हिनं बेलिंडा बेंचिच हिच्यावर ६-२, ६-० असा विजय मिळवला. मिश्र दुहेरीत कॅतरीना सिनियाकोव्हा आणि सेम व्हरबीक या जोडीनं जो सॅलिसबरी आणि लुईसा स्टेफनी या जोडीचा ७-६, ७-६ असा थेट सेट्समध्ये पराभव करून अजिंक्यपदावर नाव कोरलं.

//<><><><><>//